Feb 2020

# विद्यावार्ता®

MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

SPECIAL ISSUE-2020 04

Peer Reviewed International Refereed Research Journal





**शंकरराव पाटील महाविद्यालय, भूम व**
**डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद**
यांच्या संयुक्त विद्यमाने

## ''राजर्षी शाहू, महात्मा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान '' या विषयावर

## एक दिवसीय राष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद



प्राचार्य
**डॉ.श्रीकृष्ण चंदनशिव**

25) स्वामी दयानंद सरस्वती पुनर्संचित आर्यधर्म आणि आर्यसमाज संबंधित राजर्षी शाहू महाराजांचे विचार
प्रा.डॉ. कुलकर्णी जयश्री रमेश, उस्मानाबाद ||79

26) महात्मा फुले यांचे शिक्षणविषयक विचार आणि कार्य
डॉ. उमेश मुंढे, जालना ||81

27) राजर्षी शाहू महाराजांचे भटक्या विमुक्त जमातीसाठीच्या कार्याचा आढावा
आकाश शेषराव बांगर, हिंगोली ||85

28) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक विचार
प्रा.डॉ. लांडगे पंडित शिवराम, परभणी ||87

29) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शेतीविषयक विचार
डॉ. अरुण खर्डे, कु. साडेकर राधिका, परंडा ||90

30) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राजकीय विचार — एक अभ्यास
प्रा. पवार बंडू थावरा, बीड ||92

31) शाहु आंबेडकर यांचे आरक्षण विषयक विचार
डॉ. धम्मानंद गायकवाड, डॉ. सिध्दार्थ वाघमारे, कांबळे प्रदिप ||96

32) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार
डॉ. अरुण चांगदेव खर्डे, कु. हन्नुरे अलनबी भिक्कन, परंडा ||99

33) महात्मा जोतिराव फुले यांचे आर्थिक विचार
डॉ. मुळे पी. एम., बीड ||101

34) सामाजिक समस्याच्या निर्मुलनातील डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे विचार
प्रा.डॉ. शेकोबा परशुराम ढोले, नांदेड ||103

35) महात्मा फुले यांचे सार्वजनिक सत्यधर्म विषयक विचार
प्रा.नवनाथ ज्ञानोबा पवळे, शिरूर (का) ||109

36) महात्मा फुले यांचे साहित्यातील योगदान
श्री. गोविंद गरड, प्रा. डॉ. सोपान सुरवसे, बीड ||112

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

**25**

# स्वामी दयानंद सरस्वती पुनर्संचित आर्यधर्म आणि आर्यसमाज संबंधित राजर्षी शाहू महाराजांचे विचार

**प्रा.डॉ. कुलकर्णी जयश्री रमेश**
इतिहास विभागप्रमुखस,
व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय,
उस्मानाबाद

***********

**प्रस्तावना :-**

इ.स.१८८४ मध्ये शाहू महाराज करवीरच्या सिंहासनावर सत्तारूढ झाले आणि केवळ करवीर राज्याच्याच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्र व आसपासच्या प्रदेशातील समाजपरिवर्तनाचे, समाजसुधारणांचे युग प्रारंभ झाले. छत्रपती शिवरायांचा लोकहिताचा वारसा बदलत्या कालानुरूप जोमाने चालविणारे सर्वांगिण नेतृत्व महाराष्ट्राला लाभले. राजर्षी शाहू महाराजांनी बहुजनहितार्थ सामाजिक, धार्मिक, आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक क्षेत्रात क्रांतीकारक सुधारणा करीत असतानाच समकालीन सामाजिक-धार्मिक सुधारणा चळवळी चालविणाऱ्या संघटनांच्या कार्यालाही सक्रिय पाठींबा दिला. त्यापैकीच एक आर्य समाज होय. शाहू महाराजांचे आर्य समाजाप्रती असलेली बांधिलकी ही समाजसुधारणा व राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या भावनेतून आलेली दिसते.

**अभ्यास क्षेत्र :-**

राजर्षी शाहू यांचे चरित्र व कार्य हे खूप व्यापक असून महाराष्ट्राच्या सुधारणा पर्वातील मैलाचा दगड ठरते. समाजजीवनाच्या प्रत्येक अंगाला स्पर्श करणारे ठरते. त्यांच्या कार्याचे अनेक पैलू किंवा कंगोरे पाहता महाराष्ट्रातील आर्य समाजाच्या कार्याचे प्रतिनिधीत्व त्यांनी खंबीरपणे केलेले दिसते. या शोधनिबंधात त्यांचे आर्य समाज व स्वामी दयानंद सरस्वती पुनर्संचित आर्य धर्म संबंधीचे विचार संदर्भीय भाषण व उल्लेखांच्या सहाय्याने मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**संशोधन पध्दती :-**

सदर शोधनिबंध लिहिण्यासाठी शाहू महाराजांची भाषणे, त्यांच्या चरित्रकार्यालवर प्रकाश टाकणारे संदर्भ ग्रंथ याचा वापर केलेला आहे.

**गृहितके व उद्दिष्टे :-**

१. छत्रपती राजर्षी शाहू यांचे आर्य समाजासंबंधीचे विचार जाणून घेणे.

२. आर्य समाज व स्वामी दयानंद सरस्वती पुनर्संचयित आर्य समाज हा कर्मठ, सनातनी किंवा पूर्वगामी संघटना नसून ती भारताची कर्मनिष्ठ समाजसुधारकांची संघटना होती. त्यामुळेच राजर्षी शाहू महाराजांसारख्या दृष्ट्या सुधारकाने या संघटनेच्या कार्यात मोलाचा वाटा उचलला.

**विषय मांडणी :-**

शाहू महाराजांच्या मनावर आर्य समाजाचा दाट प्रभाव होता. 'मी हृदयाने आर्य समाजी आहे. वैदिक धर्म विश्वव्यापी धर्म बनेल.' या त्यांच्या वक्तव्यातून हे प्रतित होते, प्रत्ययास येते. वास्तविक आर्य समाज हा कर्मठ व सनातनवादी असला पाहिजे. अशा ग्रहातून राजर्षी शाहू महाराजांसारखा पुरोगामी, सर्वश्रुत सहिष्णूतावादी, समतावादी, लोकराजा आर्य समाजाच्या प्रभावाखाली कसा आला, असा प्रश्न अनेकांना पडतो. पण मूलतः आर्य समाज हा मागासलेल्या स्थितीबध्द विचारांचा पुरस्कर्ता नाही, तर तो वेदप्रामाण्यवादी आहे. तो आपल्या एकांतिक वेदनिष्ठेमुळे स्मृति, पुराणे, हिंदू समाजातील रुढी, मूर्तीपूजा, धार्मिक अवडंबर यांचा कडवा विरोधक राहिला आहे. अशा परंपरावादावर हल्ले करण्याचे कार्य आर्य समाज करीत आला आहे. म्हणूनच आर्य समाज ही महाराष्ट्रातल्या बोलक्या सुधारकांची संघटना नसून ती आक्रमकांची संघटना Arho AgoZaha H[illegible]a åhUVnV.[१] त्यांच्या मते समाजसुधारकांच्या सुगळ्या सुधारणावादी कार्यक्रमांची प्रचंड संख्येने अंमलबजावणी करणारा हा शक्तीस्त्रोत आहे.[२] आर्य समाजाने वैदिक परंपरेचा अभिमान आणि सगळ्या समाज सुधारणा यांचा समन्वय प्रत्यक्षात आणून दाखविला आहे. शिवाय आर्य समाज राष्ट्रीय स्वातंत्र्याचा कडवा पुरस्कर्ता होय.[३] आर्य समाजाच्या याच गोष्टीमुळे राजर्षी शाहू महाराज आर्य समाजाकडे ओढले गेले आणि महाराष्ट्रातील आर्य समाजाच्या चळवळीचे प्रतिनिधीत्व त्यांनी केले, असे लक्षात येते.

**राजर्षी शाहू महाराजांचा आर्य समाजाशी आलेला प्रारंभिक संबंध :-**

राजर्षी शाहू महाराजांचा त्यांच्या विद्यार्थीदशेपासूनच आर्य समाजाशी संबंध आला होता. त्यांच्या राज्यरोहणापूर्वी इ.स.१८८२ साली उत्तर हिंदुस्थानच्या शैक्षणिक सफरीत असता मथुसा येथे आर्य समाजाने त्यांचा मानपत्र देऊन गौरव केला होता.[४] त्यानंतर इ.स.१९०२ मध्ये इंग्लंडच्या प्रवासात इदारचे नरेश सर प्रतापसिंह महाराजांशी झालेल्या आर्य समाजविषयक चर्चेतुन त्यांना आर्य समाजाचा अधिक परिचय झाला. 'प्रतापसिंहानीच आपणास आर्य समाजाची मते समजावून दिली'[५] असा उल्लेखही शाहू महाराजांनी आपल्या भाषणात केलेला होता. याशिवाय नंतरच्याकाळात बडोद्यातील वास्तव्यात तेथील आर्य समाजाचे प्रचारक पंडित आत्माराम यांच्याशी झालेल्या भेटीगाठीतून ते खऱ्या अर्थाने आर्य समाजाकडे आकृष्ट होऊन त्यांनी आयृ समाजाचा स्वीकार केला.[६]

**आयर्य समाजाची तत्त्वे आणि राजर्षी शाहू यांच्या विचारातील सहसंबंध :-**

राजर्षी शाहू महाराजांनी ८ मार्च १९२० रोजी सौराष्ट्रातील भावनगर येथे अखिल भारतीय आर्य समाजाच्या परिषदेच्या समारोप प्रसंगी केलेल्या भाषणात महर्षि दयानंदांच्या जीवितकार्याची महती सांगून वैदिक धर्म/आर्य धर्मच देशाला जागृत करणारी रामबाण मात्रा ठरेल, असा विश्वास व्यक्त केला आहे.[७] शिवाय भावी काळात हा आर्यधर्म विश्वव्यापी बनेल असा आशावादही प्रकट केला आहे. इ.स.१८९९ मधील वेदोक्त प्रकरणातून शाहू महाराजांनी वेदाधिकार सार्वत्रिक करण्याचा चालविलेला प्रयत्न प्रस्थापित उच्चभ्रू वर्णाकडून हाणून पाडण्याचा अथक प्रयत्न चालू होता. अशावेळी वैदिक धर्माच्या पुनरूज्जीवनासाठी पुनर्संचयनासाठी स्वामी दयानंद सरस्वतींनी चालविलेली आर्य समाजरुपी चळवळ आपल्या कार्यास पूर्णत्व देईल असा विश्वास शाहू महाराजांना वाटला. त्यांच्या भाषणातून तो व्यक्त झालेला दिसतो. शाहू महाराजांना समाजातील स्त्री-पुरूषांमध्ये, जाती-धर्मांमध्ये समानता एकता आणण्याबरोबरच सर्वांना समान अधिकार द्यावयाचे होते. भारतभरात पसरलेल्या अंधश्रध्दा, बालविवाह, स्त्रीयांची दुरावस्था, बहुविवाह, अज्ञान-शिक्षणाचा अभाव, मद्यपान, अस्पृश्यता, कर्मकांड, दुराचार या गोष्टींचा बंदोबस्त करावयाचा होता. ब्राह्मणांबरोबरच सर्वसामान्य समाज, अठरापगड जमातींना वेदांचा अधिकार देत असताना जाती-धर्म-पंथांच्या भिंती दूर करावयाच्या होत्या. स्त्री शिक्षण, अस्पृश्य शिक्षण, सर्वांना व्यक्तिस्वातंत्र्य व जात-पंथ-धर्माचा विचार न करता रोटी-बेटी व्यवहार प्रस्थापित करावयाचे होते. त्यांच्या या विचारांशी मिळती-जुळती तत्त्वे आर्य समाज व त्यांच्या आर्य धर्म किंवा वैदिक धर्म पुनरूज्जीवन चळवळीच्या कार्यात अंतर्भूत होती.

आर्य समाज स्पृश्यास्पृश्यतेचे काल्पनिक बंध मोडून मानवता विकास करू पाहत होता. आर्यधर्म सर्व जाती-धर्मियांसाठी खुला करू पाहत होता. देशाची तत्कालीन पारतंत्रापासून सुटका करण्यासाठी हवी असलेली स्थिर एकता ही धार्मिक एकतेच्या आधारावर निर्माण करू पहात होता. स्वामी दयानंद सरस्वतींनी या विचारांचा प्रसार व प्रचार भारतभरात वेगाने सुरू केला होता. त्यांच्या मते वैदिक धर्म व धर्मग्रंथापेक्षा जास्त वैज्ञानिक आहेत.[८] सर्व सत्य विद्यांचे मूल व भारतीय संस्कृतीचे स्त्रोत आहे.[९] आपल्या या महान संस्कृतीचे जतन व सदुपयोग भारतीयांनी करायला हवे. त्यातूनच खऱ्या मानव धर्माची रूजवणूक समाजात होईल. या आपल्या विचारांना मूर्त रुप देण्यासाठी 'कर्मण्येवाधिकारस्ये' अशा स्वामी दयानंद सरस्वतींनी आर्य समाजाची स्थापना केली. या संघटनेद्वारे सर्व सुधारणांचे मूळ असलेले शिक्षण क्षेत्र प्रगल्भ करण्याचे व त्या पाठोपाठ वैदिक धर्माचा प्रसार भारतीय हिंदूबरोबरच युरोपीय ख्रिश्चनांमध्येही केला.

राजर्षी शाहू महाराजांनी केवळ करवीर संस्थानामध्येच नव्हे तर महाराष्ट्र व परिसरामध्ये शिक्षणाचा प्रसार व सार्वत्रिककरण केले. लघुउद्योग, व्यवसाय, शेती, बलोपासना, स्त्री शिक्षण, स्त्री-पुरूष समानता, विधवा विवाह, प्रौढविवाह, अस्पृश्यता निर्मुलन, तळागाळातल्याचे पुनरुत्थान असे कार्य केले. स्वामी दयानंद सरस्वती व त्यांच्या आर्य समाज संघटनेचेही हेच कार्य भारतभर केले. विशेष म्हणजे दोघांचेही कार्यामधील उद्देश समान आहेत. हे लक्षात आल्यामुळे शाहू महाराजांनी आर्य समाजास राजाश्रय देऊन कोल्हापूर व परिसरातील शाळा, गुरूकूल, वसतिगृहे, काही काळासाठी आर्य समाजाकडे सोपविली. तसेच कोल्हापूर जवळील केरले सारख्या ठिकाणच्या आर्य समाजाच्या गुरूकुलास आर्थिक सहकार्य दिले. स्वामी दयानंद सरस्वतीचा सत्यार्थ प्रकाश या ग्रंथाचे वाचन केवळ गुरूकुलातील विद्यार्थ्यांनीच नव्हे, तर पाटील, तलाठ्याचे ते प्रशिक्षण वर्ग सुरू केलेले होते. त्यातील विद्यार्थ्यांनाही त्याचे अध्ययन अनिवार्य केले.[१०] आर्य समाज व राजर्षी शाहू यांच्या विचार-कार्य यांचा अभ्यास केल्यास एक लक्षात येते की, भारतात एकता, समानता आणायची असेल तर आर्य समाज

व आर्य धर्माशिवाय पर्याय नाही, हे विशाल कार्य सत्यशोधक समाज वा इतर संघटनांच्या आवाक्यातले नाही, असे शाहू महाराजांचे स्पष्ट मत होते. त्यांना आर्यधर्म हा अखिल मनुष्यमात्रास व्यक्तीस्वातंत्र्य व समता बहाल करणारा मानवधर्म व पर्यायाने विश्वधर्म आहे, असा ठाम विश्वास होता.

संदर्भसूची :-


१. नरहर कुरूंदकर – आर्य समाज, कोल्हापूर प्रकाशित लेखसंग्रह, दि.३० जानेवारी २०१९, पृष्ठ क्र.१
२. कित्ता – पृष्ठ क्र.२
३. संपादक, भू.बा.जाधव- राजर्षी शाहू महाराजांची भाषणे, कोल्हापूर, प्रथमावृत्ती – १९७१, पृष्ठ क्र.१३९
४. संपादक, प्रकाशक : डॉ.जयसिंगराव पवार : राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, द्वितीय आवृत्ती – पृष्ठ क्र.१३५
५. कित्ता
६. य.दि.फडके–शाहू छत्रपती आणि लोकमान्य – फडके प्रकाशन, पुणे–१९८२– पृष्ठ क्र.१८७
७. संपादक, प्रकाशक डॉ.जयसिंगराव पवार – राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ–२००७, द्वितीय आवृत्ती, पृष्ठ क्र.८३९
८. डॉ.शान्ता मल्होत्रा, स्वामी दयानंद सरस्वती के राजनीतिक विचार- के.के.पब्लिकेशन, नई दिल्ली– १९९९, प्रथमावृत्ती, पृष्ठ क्र.८१,८२
९. कित्ता.
१०. राजर्षी शाहू छत्रपतींचे निवडक आदेश – संकलक शामराव पाटील, धाटावकर – भाग २ – मुंबई, १९८९, पृष्ठ क्र.१३


❑❑❑

26

# महात्मा फुले यांचे शिक्षणविषयक विचार आणि कार्य

डॉ. उमेश मुंढे
मराठी विभाग प्रमुख,
राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालय, जालना

भारतामध्ये १९ वे शतक हे प्रबोधनाचे युग मानले जाते. या शतकामध्ये भारतात अनेक समाजसुधारक होऊन गेले. त्यामध्ये महात्मा ज्योतीबा फुले यांचे नाव अग्रगण्य स्थानावर आहे. या समाजसुधारकांनी अनिष्ट प्रथा, रुढी-चालीरीती, परंपरा यांना कायमच्या संपवण्यासाठी सातत्याने प्रयत्न केलेला आहेत.

ज्योतीबा फुले हे थोर क्रांतीकारक पुरूष होते. त्यांनी शूद्र व स्त्री स्वातंत्र्याचा आणि शिक्षणाचा विचार अतिशय समर्थपणे मांडला. विधवांचे केशवपणास बंदी, विधवा पूर्नविवाहास बंदी, सतीप्रथा, बहुपत्नीत्वाची प्रथा, स्त्रियांचा हिन दर्जा आणि अज्ञान, त्यांचे शारीरिक व मानसिक शोषण यांच्या विरोधात प्रथम आवाज उठविणारे व अनिष्ठ प्रथांना प्रतिबंध घालण्याचे काम ज्योतीबा फुले यांनी केले. म्हणून त्यांना 'महात्मा' म्हणतात. मनुष्य जातीला जन्म देणारी, संवर्धन करणारी स्त्री पुरुषांपेक्षा सर्वांगीण श्रेष्ठ आहे. स्त्री ही गुलाम होवू शकत नाही असा अतिशय मूलगामी विचार म. फुले यांनी मांडला. हिंदू धर्मप्रथांना व हिंदूधर्मग्रंथांना त्यांनी विरोध केला. भारतीय समाजात जातीयतेचा व स्पर्श-अस्पर्शतेचा पगडा असल्यामुळे त्यावर मोठ्या प्रमाणात आवाज उठवण्याचे महत्त्वाचे कार्य त्यांनी केलेले आहे. शतकानुशतके बहुजन व स्त्री वर्गाला जाणिवपूर्वक शिक्षणापासून दूर ठेवलेल्या वर्गाला शिक्षण देण्याचे अतिशय महत्त्वाचे कार्य केलेले दिसते. समाजपरिवर्तन व विकासाच्या दृष्टीने शिक्षणाचे महत्त्व त्यांना पटले होते. त्या समाजाचा शिक्षणाशिवाय विकास होणार नाही हे त्यांनी ओळखले होते.

'विद्येविना मती गेली, मति विना नीती गेली,